International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# आर्थिक विषमता आणि सामाजिक न्याय

**डॉ. मंगल नागोराव मारकड**

*सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,*

*श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय आटपाडी, जिल्हा – सांगली.*

*Corresponding Author – डॉ. मंगल नागोराव मारकड*

DOI - 10.5281/zenodo.18655126

**प्रस्तावना:**

विषमता ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. भारतासारख्या विकसनशील देशात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात आढळून येते. विकसनशील देशात मुठभर श्रीमंताचा एक वर्ग असतो तर दारिद्र्यात कितपत पडलेला दुसरा फार मोठा वर्ग असतो. सरकार देशातील आर्थिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न करीत असते. देशातील लोकांमध्ये उत्पन्न व संपत्तीचे वाटत असमान होणे म्हणजे आर्थिक विषमता होय. आर्थिक विषमतेमुळे गरीब आणि श्रीमंत याच्यात मोठी दरी निर्माण होते. ही आर्थिक विषमता कमी झाल्याशिवाय सामाजिक न्याय प्रस्थापित होऊ शकत नाही. स्वातंत्र्यानंतर भारतात आर्थिक विषमता वेगाने वाढत आहे. प्रत्येक राज्यातील लोकांचा एक सारखा विकास झालेला नाही. मुटभर लोकांकडे संपत्तीचे केंद्रीकरण झालेले आहेत. आर्थिक विषमता हे आर्थिक वाढीस अडथळा आणते.

**संशोधनाचे उद्देश:**

१) भारतातील आर्थिक विषमतेचा अभ्यास करणे.
२) आर्थिक विषमतेच्या कारणांचा अभ्यास करणे.
३) आर्थिक विषमता कमी करण्यासाठी उपाय योजना सुचविणे.

**गृहिते:**

१) भारतात आर्थिक विषमतेचे प्रमाण जास्त आहे.
२) सरकारद्वारे राबविण्यात येणाऱ्या उपायोजनेमुळे आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झाली.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंध हा पूर्णतः दुय्यम साधनसामग्रीवर आधारलेला आहे. त्यामध्ये मासिके, वर्तमानपत्रे, संदर्भ ग्रंथ, आणि इंटरनेटवरील माहितीचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर माहितीच्या आधारे प्रस्तुत शोध निबंधामध्ये वर्णनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे.

**आर्थिक विषमता मोजण्याचे प्रमुख साधने:**

आर्थिक विषमता मोजण्यासाठी उत्पन्न संपत्ती आणि उपभोग यावर लक्ष केंद्रित केले जाते. ज्यात गिनी गुणांक, लॉरेन्स वक्र आणि विविध उत्पन्न किंवा संपत्तीच्या टक्केवारीचा वापर होतो.

१) **गिनी गुणांक**: गिनी गुणांक हा ० ते १ दरम्यान असतो जिथे ० म्हणजे पूर्ण समानता आणि १ म्हणजे पूर्ण असमानता दर्शवते. हे उत्पन्न आणि संपत्तीच्या वितरणाचे मापन करते.

२) **लॉरेन्स वक्र:** लॉरेन्स वक्र हा एकूण लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार त्यांना मिळणाऱ्या एकूण उत्पन्नाची टक्केवारी दर्शवते. हा वक्र पूर्ण समांतर रेषेपासून दूर जातो तेवढी असमानता जास्त दर्शवितो.

३) **उत्पन्न किंवा संपत्तीची टक्केवारी:** समाजातील ठराविक टक्के लोकांकडे किती राष्ट्रीय उत्पन्न किंवा संपत्ती आहे हे मोजले जाते.

**आर्थिक विषमतेची कारणे:**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आर्थिक विषमता आढळते. म्हणून भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. आर्थिक नियोजनाचा अवलंब केला पण आर्थिक विषमता कमी होण्याऐवजी वाढत असल्याच्या आढळून येते. २०१७ मध्ये भारताचा संपत्तीचा गिनी गुणांक ०.८३ होता. जो भारताला सर्वाधिक विषमता असलेल्या देशांमध्ये स्थान देतो.

**१) संपत्तीची विषम वाटणी:**

भारतात जमीन शेअर्स औद्योगिक संस्था इत्यादीच्या मालिकीत प्रचंड विषमता आहे.

**२) वारसा हक्क:**

वारसा हक्कामुळे वडिलोपार्जित मालमत्तेचे वाटप व्यक्तीच्या मुलांमध्ये होते. वारसा हक्काने श्रीमंतांच्या मुलांना प्रचंड संपत्ती मिळते. श्रीमंतांच्या मुलांना गाडी, बंगला, सोने, जमीन अशी संपत्ती मिळते. तर गरिबांच्या मुलांना संपत्ती न मिळता वडीलोपार्जित कर्जे फेडावे लागतात. वारसा हक्काच्या कायद्याने विषमता सातत्याने टिकून राहते.

**३) भिन्न पात्रता:**

जन्मजात काही व्यक्ती बुद्धिमान व कार्यक्षम असतात. अशा व्यक्तींना चांगले उत्पन्न मिळते. काही लोक कौशल्याच्या बळावर यशस्वी होतात आणि जास्त उत्पन्न मिळतात. पण अशा पात्रता नसणाऱ्या व्यक्तींना कमी उत्पन्न मिळते. पात्रतेतील भिन्नतेमुळे आर्थिक विषमता वाढते.

**४) व्यवसाय भिन्नता:**

ज्या व्यवसायात मोठी जबाबदारी असते, विशेष शैक्षणिक गुणवत्ता गरजेचे असते विशेष प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्य व बुद्धिमत्तेचे गरज असते, ज्या व्यवसायात धोके पत्करावे लागतात. तिथे जास्त उत्पन्न मिळते

**५) असमान संधी:**

सर्वच लोकांना विकासासाठी आवश्यक असणारी समान परिस्थिती लाभत नाही. श्रीमंत कुटुंबात जन्मलेल्या व्यक्तींना अनुकूल परिस्थिती लागते. त्यांना चांगले शिक्षण घेता येते चांगली नोकरी मिळते. परंतु गरीब कुटुंबात जन्माला आलेल्या मुलांना हुशार असूनही पैशाच्या कमतरतेमुळे चांगले शिक्षण घेता येत नाही. त्यामुळे त्यांना चांगले नोकरी मिळत नाही. पात्रता असून सुद्धा भांडवलाच्या कमतरतेमुळे उद्योग धंदा स्थापन करता येत नाही. असमान संधीमुळे आर्थिक विषमता वाढत जाते.

**६) मक्तेदारी व आर्थिक शक्तीचे केंद्रकरण:**

स्वातंत्र्यानंतर भारतात मक्तेदारी व आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण वाढत आहे. मक्तेदाराचे प्रमुख उद्दिष्ट महत्तम नफा मिळवणे हे असते. मक्तेदारीमुळे वस्तूच्या किमती वाढतात. मक्तेदाराचे उत्पन्नही वाढते पण सर्वसामान्य लोकांना त्रास सहन करावा लागतो.

**७) कर चुकविणे:**

करपात्र उत्पन्न कमी करण्यासाठी आयकर विभागाला उत्पन्नाची चुकीची माहिती देणे म्हणजे कर चोरी होय. जेव्हा व्यक्ती किंवा व्यवसाय कर भरण्याचे टाळण्याचा प्रयत्न करतात तेव्हा ते कर चोरी करतात. महालनोबीस समितीच्या मते उत्पन्न व संपत्ती यांच्यातील विषमतेसाठी कर चोरी महत्त्वाचे कारण आहे. समाजातील श्रीमंत वर्ग करचूकवेगिरी कुशलतेने करतात आणि कळया पैशाच्या

माध्यमाने संपत्ती साठवितात आणि ते अधिक श्रीमंत होतात. दुसऱ्या बाजूला समाजातील गरीब व मध्यमवर्ग आपले दारिद्र्य ही कमी करू शकत नाही.

**८) भांडवलप्रधान तंत्र:**

भांडवलप्रधान तंत्राचा वाढता उपयोग ही आर्थिक विषमता वाढीचे महत्त्वाचे कारण आहे. भारतामध्ये श्रमिकाची विपुल संख्या आहे भांडवलाची कमतरता आहे. अशा मध्ये श्रमप्रधान तंत्रज्ञानाचा वापर केल्यानंतर बेरोजगारीत वाढ होते. सध्या शहरी व ग्रामीण क्षेत्रात भांडवल प्रधान तंत्रज्ञानाचा वापर मोठ्याने वाढत आहे.

**९) चलनवाढ:**

चलनवाढ हे आर्थिक विषमतेचे महत्त्वाचे कारण आहे. चलनवाढीमुळे स्थिर उत्पन्न असणाऱ्या गटावर विपरीत परिणाम होतो. विशेषतः नोकर, कामगार, भूमीहीन, शेतमजूर यांच्यावर चलनवाढीचा अनिष्ट परिणाम होतो. दुसऱ्या बाजूला मोठे जमीनदार उद्योगपती व्यवसाय व्यापारी यांच्या वर चलनवाढीचा काही परिणाम होत नाही. सतत वाढणारे किमतीमुळे आर्थिक विषमता वाढत जाते. त्याचप्रमाणे विविध क्षेत्रातील अल्प उत्पादकता, भ्रष्टाचार आणि अप्रत्यक्ष कराचा भार, उत्पादन साधनाची विषम वाटणे यामुळे सुद्धा आर्थिक विषमता वाढत जाते.

**आर्थिक विषमता कमी करण्यासाठी उपाय:**

**१) प्रगतिशील कर रचना:**

प्रगतिशील कर म्हणजे व्यक्तीचे उत्पन्न पातळी जसजसे वाढत जाईल तसतशी कराचे प्रमाण सुद्धा वाढत जाईल. भारतात जसजसे उत्पन्न वाढत जाते तसतसे जास्त उत्पन्न कर संपत्ती कर मालमत्ता कर आकारले जातात. तर गरिबांसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूवर कमी कर आकारले जातात मात्र चैनीच्या वस्तूवर जास्त कर आकारले जातात.

**२) कमाल मालमत्ता मर्यादा कायदे:**

भारताच्या जमिनीच्या वाटपात प्रचंड विषमता आहे. ही विषमता कमी करण्यासाठी महाराष्ट्रात कमाल मालमत्ता मर्यादा कायदा १९६१ मध्ये लागू झाला. कमाल मालमत्ता मर्यादा कायदा म्हणजे सरकारद्वारे प्रत्येक व्यक्ती किंवा कुटुंबाला धारणा करता येणाऱ्या जमिनीच्या कमाल मर्यादा साठी कायदे. ह्या कायद्याचा उद्देश प्रत्येक व्यक्तीच्या मालकीची जमीन मर्यादित ठेवणे व अतिरिक्त जमीन ताब्यात घेऊन भूमीहीन आणि गरजू लोकांना वाटणे हा आहे. तर नागरी जमीन अधिनियम १९७६ शहरी जमिनीसाठी लागू झाला त्याचा उद्देश साठेबाजी थांबविणे हा होता पण तो बहुतेक राज्यामध्ये रद्द झाला.

**३) वारसाहक्क मर्यादित:**

वारसा हक्काने एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याची मालमत्ता अधिकार आणि कर्ज त्याच्या कायदेशीर वारसांना मिळते. वारसा हक्काने आर्थिक विषमता वाढत जाते. वारसा हक्काने मिळणारे संपत्ती कमी करण्यासाठी भारतात मालमत्ता, कर देणगी कर, असे अनेक कर आकारण्याचा प्रयत्न होत आहे.

**४) किंमत नियंत्रण वाटप व्यवस्था:**

भाववाढीमुळे गरिबांचे वास्तव उत्पन्न कमी राहते. आर्थिक विषमता रोखण्यासाठी भाववाढ कमी करणे हे महत्त्वाचे आहे. व्यापारी व उद्योगपती कृत्रिम टंचाई निर्माण करून साठेबाजी करून भाववाढ करतात आणि नफा मिळवतात. किंमत नियंत्रण व वाटप व्यवस्था म्हणजे वस्तू आणि सेवांच्या किमती यांच्या वितरणावर सरकारद्वारे केले जाणारे नियंत्रण. जेणेकरून त्या सर्वांना त्या वस्तूच्या किमती परवडतील विशेषतः तुटवडा असणाऱ्या वस्तूच्या बाबतीत किंमत कमाल मर्यादा आणि किंमत किमान मर्यादा यासारख्या पद्धती वापरल्या जातात. तसेच पुरवठा आणि

मागणीचे संतुलन साधून संसाधनाचे न्याय वाटप सुनिश्चित केले जाते.

**५) किमान वेतन कायदे:**

भारतात १९४७ किमान वेतन कायदा लागू करण्यात आला. किमान वेतन कायदे म्हणजे कामगारांना त्यांच्या कामासाठी किमान किती पगार मिळाला हवा हे ठरवणारे कायदे आहेत. जेणेकरून कामगारांचे राहणीमान उंचावेल आणि त्यांचे शोषण होणार नाही. अनेक क्षेत्रात किमान वेतन निश्चित करण्याचा अधिकार केंद्र व राज्य सरकारला आहे. सरकार वेळोवेळी महागाई आणि राहणीमानाचा खर्च पाहून वेतनात बदल करते.

**६) सामाजिक सुरक्षा योजना:**

सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या अशा योजना ज्या नागरिकांना आरोग्य, पेन्शन, अपघात, विमा, मातृत्व लाभ आणि बेरोजगारी यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत आर्थिक सामाजिक मदत करतात. ज्यात प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन यांच्या समावेश होतो. त्यांचा उद्देश गरीबांना आणि असंघटित कामगारांना संरक्षण देणे हा आहे.

**७) समान संधी व शैक्षणिक सवलती:**

समान संधी आणि शैक्षणिक सवलती म्हणजे शिक्षणापासून वंचित असलेल्या दुर्बल घटकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शासनाकडून मिळणारी विशेष मदत आणि प्रोत्साहन जेणेकरून त्यांना इतरांच्या बरोबरीने शिकता येईल आणि समाजाच्या विकासात समान योगदान देता येईल. शिक्षणाची समान संधी देऊन जात धर्म भाषा लिंग वंश किंवा ठिकाणी यावर आधारित कोणताही भेदभाव न करिता शिक्षणाची समान संधी मिळून दिले जाते.

**८) सार्वजनिक सर्व सहकारी क्षेत्राचा विकास:**

भारतात सार्वजनिक व सहकारी क्षेत्राचा विकास वेगाने होत आहे. सार्वजनिक क्षेत्राचा उद्देश नफा कमावने नाही. समाजाच्या गरजा पूर्ण करणे आहे. जेणेकरून आर्थिक वाढीला चालना मिळून रोजगार निर्माण होईल. रस्ते, रेल्वे, बंधारे यासारखा पायाभूत सुविधांचा विकास मोठ्या प्रमाणात होत आहे. त्याचबरोबर सहकारी क्षेत्राचा उद्देश समान उद्दिष्टे असलेल्या व्यक्तींना एकत्र आणून त्याचे आर्थिक सामाजिक सांस्कृतिक गरज पूर्ण करणे आहे. सहकारी सूतगिरण्या सहकारी बँका सहकारी शेती इत्यादीमुळे मिळणाऱ्या नफा सर्व सभासदांमध्ये वाटला जातो आणि सहकार्याने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांचे हितसंबंध सुरक्षित राहतात.

**९) लोकसंख्या नियंत्रण:**

लोकसंख्या नियंत्रण आणि आर्थिक विषमता यांचा जवळचा संबंध आहे, जास्त लोकसंख्या आर्थिक विकासाला अडथळा आणते. वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारी वाढते. तसेच नैसर्गिक संसाधनावर ताण वाढतो. लोकसंख्या नियंत्रणासाठी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेणाऱ्यास पैसे देणे. दोन पेक्षा जास्त मुलांना मोफत शैक्षणिक सवलती न देणे. ह्या योजनांचा वापर करून लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणले जाते. लोकसंख्या मर्यादित राहिल्यास आर्थिक विषमता घटण्यास मदत होईल.

**१०) कुटीर उद्योगांना प्रोत्साहन:**

कुटीर उद्योगांना प्रोत्साहन दिल्याने आर्थिक विषमता कमी होते, कारण ते कमी भांडवलात ग्रामीण भागात रोजगार निर्माण करतात, महिला आणि दुर्बळ घटकांना सक्षम करतात, आणि उत्पन्नाचे न्याय्य वितरण करतात, ज्यामुळे उत्पन्न आणि संपत्तीमधील दरी कमी होते, तसेच ग्रामीण-शहरी स्थलांतर थांबते व प्रादेशिक असमतोल दूर होतो. गरिबांना असे व्यवसाय सुरू

करण्यासाठी स्वस्त जमीन, वीज, पाणी, कर्ज इत्यादी गोष्टी उपलब्ध करून दिल्या जातात.

**११) श्रम प्रधान उत्पादन तंत्र:**

श्रम प्रधान उत्पादन तंत्रात जास्त प्रमाणात श्रम आणि कमी प्रमाणात भांडवल वापरण्यात येते. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात रोजगार संधी श्रम प्रधान उत्पादन तंत्राद्वारे उपलब्ध करून दिल्या जातात. भारतासारख्या दुर्मिळ भांडवल आणि विपुल मनुष्यबळ असणाऱ्या देशात श्रमप्रधान तंत्राचा वापर प्राधान्याने करावा.

**१२) रोजगार हमी योजना:**

रोजगार हमी योजना म्हणजे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी ग्रामीण भागातील कुटुंबांना एका आर्थिक वर्षात १०० दिवसांच्या अकुशल रोजगाराची कायदेशीर हमी देते. यामध्ये काम मागणाऱ्या कुटुंबाला वेळेत काम देणे आणि न दिल्यास बेरोजगारी भत्ता देणे, तसेच ग्रामीण विकास साधणारी विविध कामे जसे की जलसंधारण, रस्ते बांधणी करणे, यावर लक्ष केंद्रित केले जाते, ज्यामुळे ग्रामीण नागरिकांचे जीवनमान उंचावते आणि त्यांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागत नाही. या योजनेमुळे गरिबांचे उत्पन्न वाढून आर्थिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न होता.

**निष्कर्ष:**

२०१७ मध्ये भारताचा संपत्तीचा गिनी गुणांक ०.८३ होता. जो भारताला सर्वाधिक विषमता असलेल्या देशांमध्ये स्थान देतो. २०२० मध्ये भारताचा गिनी गुणांक ०.३३ होता. २०२१ मध्ये भारताचा गिनी गुणांक ०.३२ होता. जागतिक बँक आकडेवारीनुसार २०२५ मध्ये भारताचा गिनी गुणांक २५.५ आहे जो भारताला जगातील सर्वात समान देशापैकी एक म्हणून दर्शवतो. तरीही आकडेवारी आणि प्रत्यक्ष परिस्थिती या तफावत असू शकते. भारताचा गिनी गुणांक जगातील चौथा सर्वात समान देश बनवतो. आर्थिक विषमता आणि सामाजिक न्याय यांचा सहसंबंध अत्यंत जवळचा असतो कोणत्याही अर्थव्यवस्थेत आर्थिक विषमता हे सामाजिक अन्यायाची असते. भारत सरकारने प्रगतिशील कर योजना, किमान वेतन कायदे, समान संधी, लघु कुटीर उद्योगाला प्रोत्साहन, किंमत नियंत्रण, सामाजिक सुरक्षितता, योजना रोजगार हमी योजना यासारख्या उपायांचा अवलंब केल्यामुळे आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झालेली आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


1. गौरव दत्त आणि अश्विनी महाजन - भारतीय अर्थव्यवस्था एस चंद अँड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड.
2. प्रो. डॉ. एन. एल. चव्हाण - भारतीय अर्थव्यवस्था प्रशांत पब्लिकेशन.
3. डॉ. एन. एन. साबळे - भारतीय अर्थव्यवस्था कैलास पब्लिकेशन.
4. डॉ. जी. एन. झांबरे - भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स.
5. प्रा. डॉ. एस. के. पगार - आर्थिक विकास आणि नियोजन, प्रशांत पब्लिकेशन.
6. प्रा. के. एच. ठक्कर - भारतीय अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन.
7. प्रा. एस. के. कुलकर्णी - आर्थिक विकास आणि नियोजन, फडके प्रकाशन.
8. डॉ. एस. व्ही. ढमढेरे - भारतीय आर्थिक विकास, डायमंड पब्लिकेशन